अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, यवतमाळ

सत्र खटला क्र. ९७/२०२५
निशाणी क्र. ३७

महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडकी — सरकारी अभियोक्ता
..वि..
प्रकाश नथ्थुजी देहारकर — आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ५** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | विना उध्दवराव गेडाम |
| वय अंदाजे ४२ वर्षे | धंदा– नौकरी, ब.नं.१६६८ पोलीस हेड कॉन्सटेबल, पो.स्टे. वडकी |
| राहणार | वडकी, ता. राळेगाव, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी पोलीस हेड कॉन्सटेबल या पदावर पोलीस स्टेशन वडकी येथे कार्यरत होती. त्यावेळी फिर्यादी पवन गिरी हे कैफियत देण्याकरीता पोलीस स्टेशनमध्ये आले होते व त्यांच्या सांगण्याप्रमाणे कैफियत (निशाणी क्रमांक २५) लिहून घेतली. त्या कैफियतवरुन मी प्रथम खबर अहवाल (निशाणी क्रमांक २६) वर माझी व फिर्यादीची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्यादीची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता मी वैद्यकीय अधिकारी राळेगाव यांना पत्र दिले होते. ते पत्र मला दाखवले, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते निशाणी क्रमांक ३८ वर आहे**. त्यानंतर मी माझ्या वरिष्ठांच्या आदेशानूसार पुढिल तपास श्री जाधव साहेबांकडे दिला.

**उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. डी. सोनटक्के यांचे मार्फत सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीची कैफियत मी हाताने लिहून घेतली.

**प्रश्न–** फिर्यादीची कैफियत हाताने लिहून घेतल्यावर तुम्ही त्यावर फिर्यादीची सही घेतली होती ?

**उत्तर–** फिर्यादीची कैफियत हाताने लिहून घेतल्यावर मी ती कैफियत संगणकावर टाईप करण्याकरीता दिली व ती टाईप झाल्यावर त्यावर फिर्यादीची सही घेतली.

३. हे म्हणणे खरे आहे की हाताने लिहिलेली कैफियत मी माझ्या वरिष्ठांकडे दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीस स्टेशनमध्ये एखाद्या व्यक्ती कैफियत देण्यास आल्यास त्याची कैफियत एकदाच घेतल्या जाते. हे म्हणणे खरे नाही की मला संगणकाचे ज्ञान नाही. मला आठवत नाही की कैफियत संगणकाच्या कोणत्या फॉन्डमध्ये (Fond) घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्याकडे कैफियत देण्याकरीता फिर्यादी आले नाही व मी कैफियत लिहून घेतली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्रमांक २५ व २६ वर खोट्या सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी ज्यावेळेस वडकी पोलीस स्टेशनला होती त्यावेळेस ठाणे अंमलदार दुसरे होते. हे म्हणणे खरे आहे की पोलीस स्टेशनमध्ये आवक जावक रजिष्टर आहे व कथित घटनेच्या वेळी सुध्दा होते. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता मी वैद्यकीय अधिकारी राळेगाव यांना जे पत्र दिले होते, त्यास पोलीस स्टेशनचा जावक क्रमांक लावलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की तसे पत्र दिलेले नसल्यामुळे जावक क्रमांक त्या पत्रावर नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी पोलीस स्टेशनला आल्याची तसेच पत्र निशाणी क्रमांक ३८ ची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी कोणतीही कारवाई केलेली नाही व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी–काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – २२/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.